# भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ मधील प्रकरण २१ अन्वये कलम २७४ अन्वये
# संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १८५/२०२५ चा अभिलेख
## मालवण येथील न्यायदंडाधिकारी वर्ग – १ यांचे न्यायालयात

**निशाणी**

| | | |
|---|---|---|
| १) अपराध घडल्याचा दिनांक | : | २९/०८/२०२५ |
| २) फिर्याद दाखल केल्याचा दिनांक | : | २९/०८/२०२५ |
| ३) फिर्यादीचे नाव, वय व पत्ता | : | जितेंद्र रमेश पेडणेकर, वय ४१ वर्षे, धंदा– नोकरी, पोहेकॉ/२४० नेमणुक– मालवण पोलीस ठाणे, जि. सिंधुदुर्ग. |
| ४) आरोपीचे नाव, वय व पत्ता | : | ईरमित रेमेत लुद्रिक, वय– ६० वर्षे, रा. देवबाग सांताक्रुझवाडी, ता. मालवण जि. सिंधुदूर्ग. |

५) अपराधाचा तपशील :

तुम्ही दि. २९/०८/२०२५ रोजी मौजे देवबाग सांताक्रुझवाडी तुमचे ताब्यात एका पिशवीमध्ये एकूण रक्कम रुपये १२००/- किंमतीच्या गोवा बनावटीच्या बॉब्स लेमन व्होडका असे इंग्रजी लेबल असलेल्या १८० मि.ली. मापाच्या दारुने भरलेल्या १२ बाटल्या गैरकायदा बिगरपरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने आपल्या ताब्यामध्ये बाळगलेल्या स्थितीत मिळून आला व त्याद्वारे तुम्ही महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) द्वारे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

६) आरोपीचे प्रतिकथन :

प्रश्न क्र. १ : अभियोग पक्षाच्या कागदपत्रांच्या प्रती तुम्हाला मिळाल्यात काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.२ : अपराधाचा जो तपशील तुम्हाला वाचून व स्पष्ट करुन सांगण्यात आला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.३ : तुम्हाला गुन्हा मान्य आहे काय ?

उत्तर : मला गुन्हा मान्य नाही.

-----------------

दिनांक : २१/०१/२०२६ (आरोपीची सही )

समक्ष,

( एम.के.फकीह )
न्यायदंडाधिकारी वर्ग-१, मालवण

आरोपीला गुन्हयाबाबतचा तपशिल वाचून दाखविला व मराठीतून समजावून सांगितला असता आरोपीने गुन्हा नाकबूल करुन अभियोग चालविण्याची तयारी दर्शविली.

( एम.के.फकीह )
दिनांक : २१/०१/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग-१, मालवण